**ठळक बातम्या**

- वक्फ सुधारणा विधेयक २०२५ ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी

- देशभरात आज रामनवमीचा उत्साह, अयोध्येत राममंदिरात विशेष किरणोत्सव

- तामिळनाडूमध्ये रामेश्वरम इथल्या नवीन पंबन रेल्वे पुलाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन

**आणि**

- जागतिक मुष्टीयुद्ध चषक स्पर्धेत भारताच्या हितेश गुलिया याने पटकावलं सुवर्णपदक

**<><><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयक २०२५ ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजुरी दिली आहे. गेल्या आठवड्यात लोकसभेत २८८ विरुद्ध २३२ मतांनी तर राज्यसभेत १२८ विरुद्ध ९५ मतांनी हे विधेयक मंजूर झालं होतं. वक्फ मालमत्ता व्यवस्थापनात असलेला पारदर्शकतेचा अभाव या नव्या कायद्यामुळे दूर होणार आहे. वक्फच्या नोंदींचं डिजिटायजेशन करणं, वक्फ मालमत्तांचं ऑडिट करणं, मालमत्तेचं सर्वेक्षण पूर्ण करणं हा या विधेयकाचा हेतू आहे. नव्या सुधारणेनुसार वक्फ बोर्डात मुस्लिम समुदायातल्या मागास घटकांना आणि महिलांना प्रतिनिधीत्व दिलं जाईल. तसंच केंद्रीकृत पोर्टलद्वारे वक्फ मालमत्तेचं व्यवस्थापन केलं जाईल.

**<><><><><><>**

आज प्रभू श्रीरामांचा जन्मदिवस म्हणजेच रामनवमी देशभरात उत्साहात साजरी केली जात आहे. अयोध्येतल्या राममंदिरासह देशातल्या विविध ठिकाणच्या राममंदिरांमध्ये दुपारी बारा वाजता रामजन्म सोहळा साजरा झाला. जगाच्या कानाकोपऱ्यातून अयोध्येत भाविक येत आहेत. देशभरात ठिकठिकाणी भजन,

कीर्तन अशा धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून गावागावांमधून शोभायात्रा देखील काढल्या जात आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना रामनवमीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. रामनवमी आपल्याला धर्म, न्याय आणि कर्तव्य भावनेची जाणीव करून देते असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. तर भगवान श्रीरामांचे आशीर्वाद आपल्या सर्वांवर राहावेत आणि आपल्याला मार्गदर्शन करत राहोत, अशी इच्छा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही रामनवमीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान राम हे केवळ एक पूजनीय देवता नाहीत, तर एक राष्ट्रीय प्रतीक असून प्रभू श्रीराम यांनी उपदेश केलेल्या मूल्यांचं पालन आणि जतन केलं पाहिजे, असंही फडणवीस यांनी म्हटलं आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही रामनवमीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामांच्या आदर्शमय जीवनातून प्रेरणा घेऊन समाजात सौहार्द, सहिष्णुता आणि सत्याची मूल्यं अधिक बळकट करावीत असं आवाहन पवार यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या संदेशात केलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समर्थ रामदास यांच्या मनाच्या श्लोकातला 'दीनानाथ हा राम कोदंडधारी, पुढे देखतां काळ पोटी थरारी' हा श्लोक उद्धृत करत सर्वांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><><>**

अयोध्येतल्या राम मंदिरात आज दुपारी बारा वाजता विशेष किरणोत्सव साजरा करण्यात आला. रामलल्लाच्या कपाळावर सूर्याच्या किरणांनी तिलक लावल्यानंतर श्रीरामांना छपन्न भोग अर्थात नैवेद्य दाखवण्यात आला. रामजन्मोत्सवानिमित्त जगाच्या कानाकोपऱ्यातून अयोध्येत आलेल्या भाविकांवर,

ड्रोनच्या सहाय्यानं शरयू नदीतल्या पाण्याचा शिडकावा करण्यात आला. याशिवाय आज संध्याकाळी मंदिरात दीपोत्सव साजरा केला जाणार आहे.

महाराष्ट्रात मुंबईमध्ये वडाळा इथल्या राममंदिरात सजावट करण्यात आली असून सकाळपासून भाविकांनी श्रीरामाच्या दर्शनासाठी रांगा लावल्या आहेत.

**हिंगोलीत** संकटमोचन हनुमान मंदिरापासून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. लहान मुलांनी श्रीराम, लक्ष्मण, सीता, हनुमान यांचा देखावा केला होता. नागपुरातही उत्साहाचं वातावरण असून पोद्दारेश्वर राम मंदिरात विविध पूजा अर्चना केल्या जात आहेत. अकोला शहरात राजेश्वर मंदिर परिसरापासून बाईक रॅली काढण्यात आली. शिर्डी इथं कालपासून सुरू झालेल्या रामनवमी उत्सवाच्या मुख्य दिवशी आज अखंड पारायण समाप्तीनंतर श्रींचे फोटो, पोथी आणि वीणा यांची मिरवणूक काढण्यात आली.

श्री साईबाबा समाधी शताब्दी स्तंभाच्या ध्वजाचं विधीवत पूजन करुन ध्वज बदलण्यात आला. या निमित्तानं राज्यातल्या विविध भाविकांच्या पायी दिंड्या शिर्डीमध्ये दाखल झाल्या असून शिर्डी भाविकांनी फुलून गेली आहे. संतनगरी शेगाव मध्येही हजारो वारकऱ्यांच्या दिंड्या दाखल झाल्या आहेत. दुपारी पालखी सोहळा आणि नगरपरिक्रमा होणार आहेत.

**<><><><><><>**

इफ्कोच्या संशोधन आणि विकास कार्यामुळे नॅनो युरीया आणि नॅनो डीएपीनं जगभरात भारताची प्रतिमा उजळली असल्याचं केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते आज गांधीनगरमधल्या कलोल इथं इफ्कोच्या सुवर्ण जयंती महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. इफ्कोच्या आधुनिक प्रयोगशाळांतल्या संशोधनाचा फायदा शेतांपर्यंत पोहोचल्याचं त्यांनी सांगितलं. इफ्कोच्या बियाणे संशोधन विभागाचं त्यांनी यावेळी उद्घाटन केलं.

**<><><><><><>**

गेल्या दहावर्षात भारतानं आपली अर्थव्यवस्था दुपटीनं वाढवली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आज तमीळनाडूत रामेश्वरम इथं मुद्रावरच्या उघडता येणाऱ्या पंबन रेल्वे पुलाच्या उद्घाटनासह विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केल्यानंतर आयोजित सभेला संबोधित करताना ते बोलत होते. गेल्या दहा वर्षात केंद्र सरकारनं पायाभूत सुविधांसाठीची अर्थसंकल्पीय तरतुद सहा पटीनं वाढवल्याचं त्यांनी सांगितलं. देशात पायाभूत सुविधांचं वेगानं काम होत असल्याचं ते म्हणाले, यावेळी त्यांनी उपस्थितांसमोर मुंबईतील अटल सेतूसह देशभरात उभारलेल्या पुलांची उदाहरणं मांडली.

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज उद्घाटन झालेल्या पंबन रेल्वे पुलाच्या उभारणीसाठी साडेपाचशे कोटी रुपयांचा खर्च आला असून, सांध्याचं जोडणीतंत्र वापरून हा पुल उभारला आहे. या नवा रेल्वेपुलामुळे रामेश्वरमची चेन्नईसोबतची दळणवळणीय जोडणी सुधारेल, आणि प्रवासी आणि मालवाहतूकीसह पर्यटन क्षेत्रालाही लाभ होईल असं ते म्हणाले.  यावेळी प्रधानमंत्र्यांनी या पुलाखालून जाणाऱ्या पहिल्या जहाजाला, तसेच या पुलावरून जाणाऱ्या रामेश्वरम तांबरम एक्सप्रेसला देखील हिरवा झेंडा दाखवला. यानंतर प्रधानमंत्री रामेश्वरममधे एका रोड शोमध्ये सहभागी झाले. त्यांनी रामनवमीच्या निमित्तानं रामेश्वरम मंदिरात जाऊन दर्शनही घेतील. यानंतर रामेश्वरम इथं आयोजित सभेत प्रधानमंत्र्यांच्या हस्ते तमीळनाडूमधील ८ हजार ३०० कोटी रुपयांच्या रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण देखील झालं.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या श्रीलंका दोऱ्याच्या आज अखेरच्या दिवशी, प्रधानमंत्री आणि श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांच्या हस्ते माहो ओमंथाई रेल्वे प्रकल्पाचं उद्घाटन झालं. यावेळी दोन्ही नेत्यांनी माहो अनुराधापुरा मार्गावर सिग्नल यंत्रणेच्या फलकाचंही अनावरण केलं. हे दोन्ही प्रकल्प भारताच्या

पाठबळानं साकारलेले प्रकल्प आहेत. या प्रकल्पांमुळे श्रीलंकेचा उत्तरेकडचा भाग आणि कोलंबो दरम्यान सुरळीत, सुरक्षित आणि विश्वासार्ह रेल्वे सेवेची सुनिश्चिती होणार आहे. त्याआधी दोन्ही नेत्यांनी जय श्रीमहाबोधी मंदिरात जाऊन प्रार्थना केली. प्रधानमंत्र्यांच्या श्रीलंका भेटीदरम्यान सद्भावनेचं प्रतीक म्हणून श्रीलंकेनं १४ भारतीय मच्छीमांरांची सुटका केली आहे.

<><><><><><>

ब्राझीलमध्ये झालेल्या जागतिक मुष्टीयुद्ध चषक स्पर्धेत आज पुरुषांच्या ७० किलो वजनी गटात भारताच्या हितेश गुलिया यानं सुवर्णपदक पटकावलं. हितेशनं अंतिम सामन्यात इंग्लंडच्या ओडेल कामारा याचा पराभव केला. भारताच्याच अभिनाश जामवालया यानं पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात रौप्यपदकाची कमाई केली. अंतिम फेरीत अभिनाशला ब्राझीलच्या युरी रीसकडून ० - ५ असा पराभव पत्करावा लागला. याआधी काल पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटात भारताच्या मनीष राठोड यानं कांस्य पदकाची कमाई केली.

<><><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि गुजरात टायटन्स यांच्यात हैदराबाद इथं संध्याकाळी साडेसात वाजता सामना होणार आहे. काल चंदीगड इथं झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं पंजाब किंग्जला ५० धावांनी पराभव केला. तत्पूर्वी काल दुसऱ्या सामन्यात, दिल्ली कॅपिटल्सनं चेन्नई सुपर किंग्जचा २५ धावांनी पराभव केला.

<><><><><><>

भारतीय जनता पार्टी आज आपला ४५वा स्थापना दिन साजरा करत आहे. यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना शुभेच्छा देतानाच देशाच्या प्रगतीसाठी अतुलनीय समर्पणाचा संकल्प करत, विकसित भारताचं

स्वप्न साकार करण्याचं आवाहन केलं आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जगत प्रकाश नड्डा, गृहमंत्री अमित शाह यांनीही पक्ष स्थापनादिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भाजपाच्या स्थापना दिनानिमित्त नागपूरमध्ये महाल परिसरातील टिळक पुतळ्याजवळच्या भाजपा महानगर कार्यालयाच्या भूमिपूजन करण्यात आलं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केंद्रीय मंत्री नितीन गडकरी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. याप्रसंगी गडकरी यांनी १९८० मध्ये स्थापन झालेल्या भाजपाच्या प्रवासाचा पट उपस्थितांसमोर मांडला. याप्रसंगी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं की, गेली २५ वर्षं या महानगर कार्यालयासाठी नागपूर भाजपच्या कार्यकत्यांनी खूप प्रयत्न केले. याप्रसंगी गडकरी यांनी १९८०मध्ये स्थापन झालेल्या भाजपाच्या प्रवासाचा पट उपस्थितांसमोर मांडला.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातल्या सावली तालुक्यातलं सादागड-हेटी हे गाव राज्यातलं पहिलं आदिवासी सौर ग्राम ठरलं आहे. केवळ २० दिवसांत सर्व अडचणी दूर करून महावितरण -जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषद प्रशासनानं या गावात शून्य वीजबिल साध्य केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजनेतील प्रति किलोवॅट ३० हजार रूपये अनुदानाचा लाभ घेत गावातील १९ घरांच्या छतावर प्रत्येकी १ किलोवॅटचे सौर प्रकल्प आणि शाळेसाठी विना-अनुदानित तत्वावर १ किलोवॅटचा स्वतंत्र सौर प्रकल्प अशी एकंदर २० किलोवॅट क्षमतेची सौर यंत्रणा बसवण्यात आली आहे. यामुळे गावात दार महिन्याला सरासरी २४०० युनिटची वीज निर्मिती होणार आहे.

**//<><><><><><>//**